दै. केसरी सप्टें. 11

# नकला, जादू आणि 'गेम शो'ने रसिकांची मने जिंकली

पुणे : 'हास्यसम्राट' फेम चैत्राली माजगावकर-भंडारी आणि सुरेंद्र माजगावकर या कन्या-पिताच्या जोडीने नकला, जादू आणि आकर्षक गेम शो सादर करून रसिकांची मने जिंकून घेतली.

'केसरी गणेशोत्सवा'त या जोडीच्या 'गंमत जंमत' गेम शो ने रसिकांची धमाल केली. प्रेक्षकांना प्रत्यक्ष सहभागी करून घेणारा हा कार्यक्रम रसिकांमध्ये खूप प्रभावी ठरला. प्रारंभी 'केसरी'चे विश्वस्त-सरव्यवस्थापक रोहित टिळक यांच्या हस्ते चैत्राली आणि सुरेंद्र माजगावकर यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रायोजक एलआयसी ऑफ इंडिया विभाग-२ चे विक्री प्रबंधक सुरेश पाटील, अलका टॉकीज चौक शाखेचे मुख्य प्रबंधक टी. पी. जोशी, सिनीअर डिव्हिजनल मॅनेजर दिलीप डुंबरे यांच्या हस्ते 'श्रीं'ची आरती करण्यात आली. यावेळी एलआयसीचे इतर कर्मचारी आणि 'केसरी'चे विश्वस्त-व्यवस्थापक रोहित टिळक उपस्थित होते.

माजगावकर कन्या-पित्याच्या जोडीने काढलेल्या कावळा, कोकिळा अशा अनेक पक्षांचे काढलेल्या आवाजाला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद दिली. त्यांनी केलेल्या गणेशवंदनाच्या, गाडी चालविण्याच्या नकलांनी प्रेक्षक खूप उल्हसित झाले.

जादूच्या प्रयोगामध्ये त्यांनी अनेक प्रेक्षकांना सहभागी करून घेतले. ५०० रुपयाच्या नोटेचे त्यांनी जादूने १० रुपयाच्या नोटेमध्ये आणि १० रुपयाच्या नोटेचे त्यांनी ५०० रुपयामध्ये रूपांतर करून दाखविले. तुकडे केलेल्या रुमालाचे जादूने अखंड रुमालात केलेल्या प्रयोगांनी सर्व प्रेक्षक अवाक् झाले. तर त्या प्रेक्षकांमधील सहा मुलींना 'स्ट्रा' सजवून रॅम्पवर चालणाऱ्या जादूस भरभरून प्रतिसाद मिळाला.

प्रेक्षकांमधील अनेकजणांना त्यांनी प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा सलमान खान, सुंदर आणि हसतमुख, लांब केस असलेल्या मुलीला ऐश्वर्या रॉय, चांगले नृत्य करू इच्छिणाऱ्या तरुणास उठवून 'सर्वोत्कृष्ट डान्सर' हा किताब दिला. तर वाढदिवस असलेल्या एका तरुणीला उठवून जादूने पाण्याच्या ग्लासमधून वाढदिवसाला थर्माकोलचे फुगे निर्माण केले.